# 'अप्पी आमची कलेक्टर' : झी मराठी घेऊन येत आहे नवीन मालिका

**▲ सातारा, दि. २२ : झी मराठी वाहिनीवर 'अप्पी आमची कलेक्टर' ही नवीन मालिका २२ ऑगस्टपासून संध्याकाळी ७ वाजता प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. ही मालिका एक वेगळा विषय घेऊन येत आहे. अपर्णा सुरेश माने म्हणजे अप्पी, ही ती मुलगी आहे जी ग्रामीण भागातील खेडेगावात रहाते. जिथे शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाहीत. तिला कुठले मार्गदर्शन नाही. पण तिचे ध्येय खूप मोठ्ठं आहे. तिला येणाऱ्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक अडचणींवर मात करुन ती कलेक्टर होते, अशी ही संघर्ष कथा आहे.**




जिल्हाधिकाऱ्यांसमवेत 'अप्पी आमची कलेक्टर' या मालिकेची टीम.

आपल्या या भूमिकेबद्दल बोलताना शिवानी नाईक म्हणाली, मी खूप भाग्यवान आहे, मला झी मराठीच्या मंचावर काम करण्याची संधी मिळत आहे. एक नवीन जबरदस्त प्रेरणा असणारी एक मोठी संकल्पना उराशी बाळगून, अनेक अडचणींवर मात करुन आपले ध्येय साध्य करणाऱ्या मुलीची भूमिका मला करायला मिळणार आहे. मी खूप खूश आहे कारण मी एका ध्येयसमर्पित मुलीची भूमिका करणार आहे आणि ही अप्पी प्रेक्षकांना नक्कीच प्रेरणा देणारी ठरेल.

मालिकेबद्दल व आपल्या भूमिकेबद्दल बोलताना शिवानी नाईक म्हणाली, ही मालिका एक वेगळा विषय घेऊन येत आहे. मी या मालिकेत अपर्णा सुरेश मानेची भूमिका साकारत आहे. तिचे बाबा रिक्षा चालवतात. तिचं छान घर आहे आणि त्या घरात आई, बाबा आणि भाऊ राहतात. तिचं एक स्वप्न आहे कलेक्टर व्हायचं. ते ती कसे साध्य करते हा तिचा प्रवास दाखवणार आहे. हे मालिकेतून प्रेक्षकांना हळू हळू उलगडत जाईल. अप्पी सामाजिक आणि कौटुंबिक अडचणींचा सामना करून काही तरी करू पाहते आणि ही भूमिका माझ्यासाठी खूप प्रेरणादायी आहे. या भूमिकेसाठी मी खूप मेहेनत घेते आहे आणि मालिका प्रेक्षकांना आवडेल, अशी अपेक्षा ठेवते.